## एचपीएल ग्रुपचे मॉड्युलर स्विचेस

भारतीय विद्युत क्षेत्रातील मोठा समूह असलेल्या एचपीएल ग्रुपने विस्ताराचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला असून, त्याअंतर्गत देशभर उपलब्ध असलेल्या आपल्या सध्याच्या उत्पादन श्रेणीत मॉड्युलर स्विचेस व खास सुट्या भागांची भर घातली आहे. यासंदर्भात सहव्यवस्थापकीय संचालक गौतम सेठ म्हणाले, एचपीएलने दोन नवे उत्पादन प्रकल्प केली आहे. एचपीएलचे शाखाप्रमुख अमित भंडारे म्हणाले, पुणे बाजारपेठेत आमची १६०० रीटेलर्सची भक्कम वितरण यंत्रणा असून, ग्राहकसेवेसाठी समर्पित जाळेही आहे. पश्चिम विभागीय विक्री व्यवस्थापक पुनित विन म्हणाले, २१ रंगांत उपलब्ध असलेले हे स्विच व सॉकिट्स घरे, कार्यालये, दुकाने व हॉटेल्ससाठी प्राधान्याने पसंतीची ब्रँड बनवण्यास सज्ज आहेत.